# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 10/03/2021 (बुधवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर काचुरवाही येथे दिनांक 08/03/2021 ते दिनांक 09/03/2021 चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– रविन्द्र तुकाराम सोमनाथे, वय 38 वर्ष, रा. काचुरवाही व त्याचे घरातील लोक हे जेवण करून झोपले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने मागच्या खिडकीचे लोखंडाचे ग्रिल काढुन घरात घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने आतमधील अलमारीत ठेवलेले सोन्याचे दागीने कि. 3,00,500/–रू. व नगदी 92,500/–रू. असा एकुण कि. 3,93,000/रु चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. विवके सोनवणे हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 500 मी अंतरावर मौजा रामटेक येथे दिनांक 09/03/2021 चे 14.30 वा. ते 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहम्मद सादीक अब्दुल रशिद, वय 47 वर्षे रा. प्लॉट नं. 9 गांजा खेत नमक कारखाण्याचे जवळ गांधीबाग नागपुर हे विट भट्टीच्या चालनाचे पैसे भरण्याकरीता आपल्या एम.एच– 31/इ.ए– 3364 क्रमांकाच्या स्विफ्ट कारने आले. यानंतर फिर्यादीने 2,40,000/– रूपये कारमध्ये पिशवीत ठेवुन कार तहसील कार्यालय जवळ पोलीस स्टेशन रामटेक समोर उभी ठेवुन तहसील कार्यालय रामटेक येथे गेले असता अज्ञात आरोपीने कारचा काच फोडुन कारमधुन नगदी 2,40,000/–रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री दत्तप्रसाद शेंडगे 9011253003 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. मौदा :– दि. 08/03/2021 चे 21:00 वा. ते दि. 08/03/2021 चे 21:05 वा. चे सुमारास 35 वर्षीय फिर्यादी/पीडिता हि आपल्या भावाच्या लग्नाकरिता गोवारी मौदा येथे आली असता कार्यक्रमात डी.जे. सुरू असतांना आरोपी नामे– निखिल सहारे, रा. भंडारा याने तिच्या इच्छा नसतांना डान्स करण्याकरीता नेले व तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (1) भादंवि. कायद्यन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजयसिंग ठाकुर 7083151993 हे करीत आहे.

# अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 2 कि.मी. मौजा ब्राम्हणीफाटा येथे दिनांक 09/03/2021 चे 15:15 वा. दरम्यान एमएच– 40/एन– 1740 क्रमांकाच्या आयसर ट्रकचा चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एम.एच–40/जे– 7875 क्रमांकाच्या हिरो होन्डा सिडी डॉन मोटरसायकला पाठीमागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार नामे– शेषराव काळे (मृतक) यांचा मृत्यु झाला. तर चंद्रशेखर काळे हे गंभीर जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविन्द्र पंढरी पांडे, वय 41 वर्ष, रा. वार्ड क्र. 5 ब्राम्हणी कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बुदे 8999694013 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 01 कि.मी. मौजा खापा ते सावनेर रोड राधाकृष्ण सभागृह जवळ येथे दिनांक 22/02/2021 चे 18:00 वा. ते 18.30 वा. दरम्यान आरोपीने आपल्या ताब्यातुन ट्रॅक्टर वाहन क्र. एम. एच–40/एल–3049 ने भरधाव व निष्काळजीपणे चालवुन अभिषेक जानीक बेठे (मृतक) वय 15 वर्ष रा. खापा यास धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी होवून मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नानकराम दौलत बेठे वय 51 वर्ष रा. बिदोनी पो.स्टे.सवर्नी ता.सौसर जि.छिंदवाडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. झांबरे 9028748409 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर